‘मराठीपुस्तके डॉट ओआरजी’ हे संकेतस्थळ बघितलं.

उद्दिष्ट उत्तम आहे. दुर्मिळ अभिजात मराठी साहित्य देशोदेशी पसरलेल्या मराठी सारस्वतांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारं मोफत उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे. या प्रयत्नांना आणखी आकार यावा, या दृष्टीनं खालील काही मुद्यांचा विचार करता येऊ शकतो.

मराठी भाषाप्रेमींच्या वाढत्या सहभागाची अपेक्षा ठेवून एक लोकचळवळ म्हणून हा उपक्रम मुख्यतः चालवला जात आहे. या उप्रकमाचं हे स्वरूप व्यापक स्तरावर तसंच ठेवून तो व्यावसायिकरीत्या (व्यापारी नव्हे) चालवला, तर त्यात अधिक परिणामकारकता येईल. त्यासाठी या उपक्रमाला काही प्रमाणात संस्थात्मक स्वरूप देणं अपरिहार्य ठरेल. नियोजन व अंमलबजावणी यांच्यासाठी एक नियंत्रक समिती स्थापन करावी लागेल. या समितीच्या सदस्यांना आपासात विविध जबाबदाऱ्या वाटून घेता येतील. या संकतेस्थळावर दिलेल्या माहितीवरून असं दिसतं की, पुस्तकं ‘कंपोज’ करणं वा त्यांचं मुद्रितशोधन करणं, यासाठीही मराठीप्रेमींच्या सहभागाची अपेक्षा ठेवण्यात आली आहे. पण हे काम व्यावसायिकरीत्या करून घेणंच योग्य ठरेल. उत्तम दर्जा कायम राखण्यासाठी हे आवश्यक आहे, असं वाटतं. अर्थात अशा प्रत्येक गोष्टीत पैशाचा प्रश्न येईल. पण पुस्तकाचं कंपोझिंग व मुद्रितशोधन यांसाठी प्रायोजक वा देणगीदार मिळवता येऊ शकतात. साधरणातः प्रत्येक २०० पानांच्या पुस्तकाला अंदाजे पाच ते सहा हजारांच्या आसपास खर्च येईल, असा हिशेब धरला, तर तेवढे पैसे देणारे मराठीप्रेमी सापडणं कठीण नाही, असं वाटतं. संकेतस्थळ कायम ‘डायनामिक’ ठेवण्यासाठी नवनवी पुस्तक त्यावर सतत दिसत जाणं आवश्यक असतं. तरच त्याचं ताजेपण टिकून राहू शकतं. ही गोष्ट ‘हौशी’ पद्धतीनं होणं कठीण असल्याचा या प्रकारच्या उपक्रमांबाबतचा आजवरचा अनुभव आहे. त्यामुळंच व्यावसायिकता आणण्याच्या दृष्टीनं पावलं टाकली जाणं गरजेचं ठरतं.

तसं झाल्यासच हा उपक्रम दीर्घकाळ चालून स्वतःचा वेगळा ठसा निर्माण करू शकतो.

तसंच दुर्मिळ मराठी अभिजात साहित्य देण्याच्या प्रयत्नांना नव्याचीही जोड दिली, तर या संकेतस्थळाची आकर्षकता वाढण्यास मदत होईल. अशा संकेतस्थळाला भेट देणारे देश-परदेशातील मराठी प्रेमीं हे जुन्याच्या बरोबर ताज्या घडामोडींबाबत जाणून घेण्यास उत्सुक असतात. अशा घडामोडींत त्यांना रस असतो. त्या दैनंदिन वृत्तपत्रांच्या संकेतस्थळांवर त्यांना वाचायला मिळत नसतात आणि अलीकडच्या काळात साहित्य व विचार या दोन्ही विश्वांशी संबंधित असलेली नियतकालिकं जवळपास अस्तंगतच झाली आहे. काही असतील, तर तो अपवादच आणि त्यांचा पसाराही अगदीच मर्यादित असतो. उदहरणार्थ, मराठी साहित्य विश्वात घडणाऱ्या घडामोडींची, मराठी विचारविश्वातील चर्चेच्या विषयासंबंधीची दखल घेणारं एखादं ‘ई नियतालिक’ या संकेतस्थळावर देता येऊ शकतं. नव्या व जुन्या पुस्तकांच्या उपलब्धतेची माहिती देता येऊ शकते. मराठी भाषेसंबंधी अलीकडच्या काळात बरीच उलटसुलट चर्चा चालू असते. मराठीच्या पिछेहाटीबद्दल चिंता बोलून दाखवली जात असते. मराठी ही ज्ञानभाषा झाली आणि ती दैनंदिन व्यवहारात वापरली गेली, तरच तिचं महत्व टिकून राहील, याबाबतही फारसं दुमत दिसत नाही. पण त्या दिशेनं संघटित प्रयत्न होताना आढळत नाहीत. हे संकेतस्थळ या प्रयत्नांतील खारीचा वाटा उचलू शकेल. उदाहरणार्थ अनेक विषयांवरची महत्वाची पुस्तकं वा इतर लिखाण हे इंग्रजी भाषेत आहे. त्यातील काही निवडक मराठीत आणण्याचा वा ते या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबवता येऊ शकतो. सगळं पुस्तक जर भाषंतरित करता येणार नसेल, तर त्याचा व्यवस्थित गोषवारा जरा विस्तृत स्वरूपात उपलब्ध करून देता येऊ शकतो. इतर भाषांतील साहित्याबाबत माहिती देण्याचाही प्रयोग करून बघता येईल. जुन्या व नवे

कादंबरीकार, कथाकार यांच्याशी बातचीत करून ती या संकेतस्थळाला भेट देणाऱ्यांना उपलब्ध करून देता येईल.

या प्रकारच्या इतर संकेतस्थळांशी जर व्यावसयिक संबंध प्रस्थापित करता येतात काय, याचाही मागोवा घेता येईल. तसं झाल्यास व्यापारी दृष्टी न ठेवताही माहितीच्या देवाणघेवाणीतून या संकेतस्थळाचं व्यवस्थापन व ते चालवणं यासाठी लागणाऱ्या रकमेतील काही वाटा उभा करता येण्याची शक्यता आहे.

सहज सुचलेले हे काही मुद्दे. त्यात भर घातला येईल.हे मुद्दे आधी कोणाला सुचलेही असतील. किंबहुना तसं घडलं असण्याचीच शक्यता जास्त आहे. कदाचित या संकेतस्थळाचं मर्यादित स्वरूप बघून ते चर्चेला घेण्यातही आले नसतील. मात्र हा चांगला उपक्रम सुरळीत चालून परिणामकारक बनवायचा असल्यास इतक्या मर्यादित स्वरूपात त्याकडं बघण्याचा पुनर्विचार व्हायला हवा, असं वाटतं.